वसई विरार शहर महानगरपालिकेच्या वसई विभागीय कार्यालयाचे सन २०१३-१४ या वित्तीय कालावधीतील जाहिरात कर नोंदवहीचे लेखापरिक्षण केले असता सदर जाहिरात कर मागणी नोंदवही महाराष्ट्र नगरपरिषदा लेखासंहिता १९७१ च्या नियम क्र.७६ मध्ये विहीत केलेल्या पध्दतीनुसार नमुना नं.५८ मध्ये ठेवणे आवश्यक आहे. तसेच सदर नोंदवहीमध्ये रोजच्या रोज जमा होणाऱ्या रकमांचे नोंदी घेणे आवश्यक आहे. परंतु संबंधीत विभागाने सदर नोंदवही नमुन्यामध्ये न ठेवल्याचे व एकत्रित गोषवारा न काढल्याचे आढळून आले आहे. **परिशिष्ट क्र.२०१ (पृष्ठ क्र.२६८)** मध्ये दर्शविलेली जाहिरात कराची रक्कम रुपये ७३६६३/- थकीत असल्याचे आढळून आले आहे. करिता सदरची थकीत रक्कम रु. ७३६६३/- मात्र महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे अनुसुची प्रकरण ८ मधील नियम क्रमांक ४२ अन्वये व्याजासह वसूल करुन महानगरपालिका निधीत जमा केल्याचे, तसेच मागणी नोंदवही नमुन्यामध्ये अद्ययावत करुन प्राधिकृत अधिका-यांची स्वाक्षरी घेऊन लेखा परीक्षणास अनुपालन दाखवावे.

वसूल पात्र रक्कम रु. ७३६६३/-

२०९. **हातगाडी परवाना शुल्क वसुली बाबत**

वसई विरार शहर महानगरपालिकेच्या वसई विभागीय कार्यालयाचे सन २०१३-१४ या वित्तीय कालावधीतील सामान्य विभागातील हातगाडी परवाना शुल्काच्या नोंदवहीचे लेखा परीक्षण केले असता नोंदवहीमध्ये हातगाडी परवाना कोणत्या वर्षी देण्यात आलेला आहे, याची नोंद नाही. त्यामुळे सदर हातगाडी परवान्याचे वार्षिक नुतनीकरण शुल्क वसुल केल्याची खातरजमा होत नाही. **परिशिष्ट क्र.२०२ (पृष्ठ क्र.२६८)** मध्ये दर्शविलेली रक्कम रुपये २२४२५०/- थकीत असल्याचे आढळून आले आहे. करिता सदरची थकीत रक्कम रु. २२४२५०/- मात्र महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे अनुसुची प्रकरण ८ मधील नियम क्रमांक ४२ अन्वये व्याजासह वसूल करुन महानगरपालिका निधीत जमा केल्याचे, तसेच मागणी नोंदवहीवर प्राधिकृत अधिका-यांची स्वाक्षरी घेऊन लेखा परीक्षणास अनुपालन दाखवावे.

वसूल पात्र रक्कम रु. २२४२५०/-

२१०. **दवाखाना विभाग - दूध-बिस्कीटे, अंडी व भोजन या सेवा पुरविणेकरिताच्या ठेक्याबाबत**

वसई विरार शहर महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागांतर्गत वसई रुग्णालयात दाखल होणाऱ्या रुग्णांना महानगरपालिकेमार्फत दूध-बिस्कीटे, अंडी व भोजन याची मोफत सेवा पुरविली जाते. सदर सेवा पुरविण्यासाठी सन २०११-१२ या वित्तीय वर्षापासून मे. महेंद्र किसन लाड यांना कार्यादेश देण्यात आला असून सन २०१२-१३ या वित्तीय वर्षामध्ये जा.क्र.७५४/२०१३ दि.३०/०३/२०१३ च्या आदेशानुसार ठेकेदारास मुदतवाढ देण्यात आलेली आहे. अशी एकूण २ वर्षापर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

शासन निर्णय क्र.भाखंस/२५१२/१०८८/उद्योग-६, दिनांक २/१/१९९२ मधील परिच्छेद क्र.८.३ (ह) पुनर्प्रत्ययी आदेश (रिपीट ऑर्डर) सुधारित मार्गदर्शक तत्वे परिशिष्ट सात अन्वये पुनर्प्रत्ययी आदेश देतांना ते सहा महिन्यांच्या अवधीकरिता द्यावयाचे आहेत. सदरचे आदेश तात्कालिक/आकस्मीक स्वरुपाचे असावेत. असे आदेश देतांना बाजारातील किंमती मूळ आदेशापेक्षा कमी नसल्याची, त्या स्थिर असल्याची शहानिशा करणे आवश्यक आहे. तसेच पुनर्प्रत्ययी आदेशाचे प्रस्ताव खरेदी समितीने/निविदा मंजुरी समितीने बाजारभावाशी तुलना करुन मंजूर करणे आवश्यक आहे. या कामी दोन वेळेस मुदतवाढ दिली आहे. सदर मुदतवाढी नियमबाह्य असल्याचे दिसून येते.

तरी या झालेल्या अनियमिततांबाबत लेखापरिक्षणास स्वयंस्पष्ट खुलासा सादर करावा.

२११. **दवाखाना विभाग - वैद्यकीय उपकरणे देखभाल दुरुस्ती सेवा पुरविणेकरिताच्या ठेक्याबाबत**

मे. ब्ल्यु मॅक्स सर्जीकल वर्क्स प्रोप. सी.जे. फ्रान्सिस यांना डी.एम. पेटीट रुग्णालयातील वैद्यकीय उपकरणे देखभाल दुरुस्ती सेवा पुरविणेबाबत सन २०११-१२ या वित्तीय वर्षापासून कार्यादेश देण्यात आला असून सन २०१२-१३ या वित्तीय वर्षामध्ये जा.क्र.७५२/२०१३ दि.३०/०३/२०१३ च्या आदेशानुसार मुदतवाढ देण्यात आली आहे. अशी एकूण २ वर्षांपर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

शासन निर्णय क्र.भाखंस/२५१२/१०८८/उद्योग-६, दिनांक २/१/१९९२ मधील परिच्छेद क्र.८.३ (ह) पुनर्प्रत्ययी आदेश (रिपीट ऑर्डर) सुधारित मार्गदर्शक तत्वे परिशिष्ट सात अन्वये पुनर्प्रत्ययी आदेश देतांना ते सहा महिन्यांच्या अवधीकरिता द्यावयाचे आहेत. सदरचे आदेश तात्कालिक/आकस्मीक स्वरुपाचे असावेत. असे आदेश देतांना बाजारातील किंमती मूळ आदेशापेक्षा कमी नसल्याची, त्या स्थिर असल्याची शहानिशा करणे आवश्यक आहे. तसेच पुनर्प्रत्ययी आदेशाचे प्रस्ताव खरेदी समितीने/निविदा मंजुरी समितीने बाजारभावाशी तुलना करुन मंजूर करणे आवश्यक आहे. या कामी दोन वेळेस मुदतवाढ दिली आहे. सदर मुदतवाढी नियमबाह्य असल्याचे दिसून येते.

तरी या झालेल्या अनियमिततांबाबत लेखापरिक्षणास स्वयंस्पष्ट खुलासा सादर करावा.

२१२. **दवाखाना विभाग - ऑक्सीजन सिलेंडर रिफिलींग ठेक्याबाबत**

मे. लिओ ऑक्सीजन यांस डी.एम.पेटीट रुग्णालयातील ऑक्सीजन सिलेंडर रिफिलींग करणेबाबतचा सन २०११-१२ या वित्तीय वर्षापासून कार्यादेश देण्यात आलेला आहे व सन २०१२-१३ या वित्तीय वर्षापासून ठेकेदारास मुदतवाढ देण्यात आलेली आहे. अशी एकूण २ वर्षे मुदतवाढ देण्यात आलेली आहे. शासन निर्णय क्र.भाखंस/२५१२/१०८८/उद्योग-६, दिनांक २/१/१९९२ मधील परिच्छेद क्र.८.३ (ह) पुनर्प्रत्ययी आदेश (रिपीट ऑर्डर) सुधारित मार्गदर्शक तत्वे परिशिष्ट सात अन्वये पुनर्प्रत्ययी आदेश देतांना ते सहा महिन्यांच्या अवधीकरिता द्यावयाचे आहेत. सदरचे आदेश तात्कालिक/आकस्मीक स्वरुपाचे असावेत. असे आदेश देतांना बाजारातील किंमती मूळ आदेशापेक्षा कमी नसल्याची, त्या स्थिर असल्याची शहानिशा करणे आवश्यक आहे. तसेच पुनर्प्रत्ययी आदेशाचे प्रस्ताव खरेदी समितीने/निविदा मंजुरी समितीने बाजारभावाशी तुलना करुन मंजूर करणे आवश्यक आहे. या कामी दोन वेळेस मुदतवाढ दिली आहे. सदर मुदतवाढी नियमबाह्य असल्याचे दिसून येते.

तरी या झालेल्या अनियमिततांबाबत लेखापरिक्षणास स्वयंस्पष्ट खुलासा सादर करावा.

२१३. **अद्ययावत साठा नोंदवही (नमुना नं.११६) उपलब्ध करुन न दिले बाबत**

वसई विरार शहर महानगरपालिकेच्या वसई विभागीय कार्यालयाचे सन २०१३-१४ या वित्तीय वर्षातील पाणी पुरवठा विभागातील अद्ययावत साठा नोंदवही (नमुना नं.११६) उपलब्ध होण्याकरिता अर्धसमास पत्र क्र.००८ दि.०९/०३/२०१५ अन्वये लेखी स्वरुपात कळवूनही उपलब्ध करुन देण्यात आले नाही.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या अनुसूची ड प्रकरण ३ भाग २ मधील (३) (६) नुसार लेखापरिक्षकाने लेखापरिक्षणासाठी मागणी केलेली दस्तऐवज व अभिलेखे, स्पष्टीकरणे इ. विहीत वेळेमध्ये पाठविली पाहिजेत. परंतु वारंवार तोंडी मागणी करुन व अर्धसमासपत्र दिल्यानंतरही उपरोक्त अभिलेख अद्ययावत करुन लेखापरिक्षणास सादर न केल्याने पाणी पुरवठा संदर्भातील मुख्यालयातून प्राप्त झालेले साहित्य व त्याच्या विनियोगाबाबत तसेच शिल्लक साहित्याबाबतचे लेखापरिक्षण करता आले नाही. सदरची बाब गंभीर असून यामध्ये अनियमितता झाली असण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे उपरोक्त साठा नोंदवही अद्ययावत करुन लेखापरिक्षणास उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही करावी व झालेल्या अनियमिततेबाबत लेखापरीक्षणास स्पष्टीकरण देऊन अनुपालन दाखवावे.

२१४. **रुग्णालयाकरिता लागणारे विविध औषधे खरेदी नोंदीतील अनियमिततेबाबत**

वसई-विरार शहर महानगरपालिका अंतर्गत कार्यरत असलेल्या रुग्णालय व इतर दवाखाने यांच्यासाठी लागणारी विविध प्रकारची औषधे वार्षिक दरपत्रकानुसार व संबंधीत रुग्णालयामार्फत मागणीपत्राच्या आधारे खरेदी केली जातात. सदर औषधे मुख्य भांडार विभागाकडून खरेदी केल्यानंतर त्याची नोंद महाराष्ट्र नगरपरिषदा लेखासंहिता १९७१ च्या नियम क्र.१४२ च्या नमुना क्र.१०९ व ११० मध्ये घेऊन संबंधीत विभागाला सूपूर्द केली जातात.

वसई येथील डी.एम.पेटिट रुग्णालयामध्ये औषधे पुरविलेल्या साठा नोंदवही नमुना क्र.११६ चा मेळ घेत असताना **परिशिष्ट क्र.२०३ (पृष्ठ क्र.२६८)** दर्शविल्यानुसार मिळालेले नग, वापरलेले नग व प्रत्यक्ष शिल्लक नग यामध्ये तफावत असल्याचे आढळून येत आहे. प्रत्यक्षात तफावत असलेले नग कोणत्या ठिकाणी वापरण्यात आले याची लेखापरिक्षणास खात्री करता आलेली नाही. तसेच साठा नोंदवही न.नं.११६ मध्ये प्रत्येक वस्तू निहाय एकत्रित गोषवारा काढून त्यावर प्राधिकृत अधिकाऱ्याची स्वाक्षरी घेतल्याचे लेखापरिक्षणास आढळून आले नाही. करिता सदर झालेल्या अनियमिततेबाबत साधार खुलासा करावा. तसेच अनियमिततेची पूर्तता करुन लेखापरिक्षणास अनुपालन दाखवावे.

२१५. **बाजार/मार्केट निविदा नस्तीमधील अनियमिततेबाबत**

प्रभाग समिती ई कार्यालयामार्फत बाजार/मार्केट साठी वार्षिक जाहिर निविदा मागविण्यात आल्या होत्या. सदर वार्षिक जाहिर निविदांच्या नस्तींचे लेखापरिक्षण केले असता सदर नस्तीमध्ये ठेकेदारासोबत महानगरपालिकेने

करारनामा केल्याचे आढळून आले आहे. परंतु करारनाम्यामध्ये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील अनुसूची ड प्रकरण ५ मधील अनुक्रमांक २ नुसार महानगरपालिकेच्या सचिवाच्या अभिरक्षेत असलेली सामान्य मुद्रा प्रत्येक संविदेवर लावणे, स्थायी समितीचे दोन सदस्य व उपायुक्त दर्जापेक्षा कमी नसलेला कोणताही अधिकारी यांचे उपस्थितीत करारपत्र लावण्यात आली पाहिजेत. प्रस्तुत प्रकरणी **परिशिष्ट क्र.२०४ (पृष्ठ क्र.२६८ ते २६९)** मध्ये दर्शविल्यानुसार याप्रकारची कोणतीही बाब लेखापरिक्षणास निदर्शनास आढळून आली नाही. करिता ह्या झालेल्या अनियमिततेची पूर्तता करुन व त्याबाबतचा साधार खुलासा करुन लेखापरिक्षणास अनुपालन दाखवावे.

२१६. **पाणीपुरवठा विभाग - नवीन नळ कनेक्शन नस्तीमधील अनियिमिततेबाबत**

मुख्य कार्यालयाच्या आदेशानुसार प्रभाग समिती ई कार्यालयामार्फत समितीच्या हद्दिमध्ये राहणाऱ्या नागरिकांना नळ कनेक्शन देण्यात येते. सन २०१३-१४ या वित्तीय वर्षामधील पाणीपुरवठा विभागाचे लेखापरीक्षण करीत असता नवीन नळ कनेक्शन मंजूर केलेल्या नस्तींचे लेखापरिक्षण केले असता **परिशिष्ट क्र.२०५(पृष्ठ क्र.२६९)** मध्ये दर्शविल्यानुसार नवीन नळ कनेक्शन मंजूर करतेवेळी आयुक्त/उपायुक्त यांची स्वाक्षरी नसल्याचे आढळून आले आहे. तसेच नळ कनेक्शन मागणी अर्जावर दिनांक व आवक क्रमांक नमूद नसल्याचे लेखापरिक्षणास दिसून आलेले आहे. संबंधीत नळ कनेक्शन धारकांना नळ कनेक्शन खरोखरच मंजूर होऊन दिलेले आहे किंवा कसे याबाबत लेखापरिक्षणास खात्री करता आली नाही. या झालेल्या अनियमिततेबाबत साधार खुलासा करावा. तसेच अनियमिततेची पूर्तता करुन लेखापरिक्षणास अनुपालन दाखवावे.

२१७. **पाणीपुरवठा विभाग - धनादेश रद्द झालेबाबत**

वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या वसई विभागीय कार्यालयातील सन २०१३-१४ या वित्तीय वर्षातील पाणी पुरवठा विभागाचे लेखापरिक्षण केले असता **परिशिष्ट क्र.२०६ (पृष्ठ क्र.२६९)** मध्ये दर्शविल्याप्रमाणे पाणीपट्टीधारकांनी पाणीपट्टी कराचा भरणा धनादेशाद्वारे केला असून सदर धनादेश बँकेकडून विविध कारणे नमूद करुन परत आल्यामुळे संबंधित पाणीपट्टीधारकांनी पाणीपट्टी कराची रक्कम दंडासहीत महानगरपालिका निधीमध्ये जमा करावयाची आहे. परंतु परिशिष्टामध्ये नमूद केल्याप्रमाणे पाणीपट्टी कराची एकूण रक्कम रु. २३४००/- व धनादेश वटणावळ फी रक्कम रु.७००/- अशी एकूण रक्कम रु.२४१००/- महानगरपालिका निधीमध्ये जमा केल्याचे दिसून येत नाही. करिता संबंधीत पाणीपट्टीधारकांकडून वरील रकमेची व्याजासहित वसुली करुन महानगरपालिका फंडात जमा करुन तसा अहवाल लेखापरिक्षणास सादर करावा.

वसूल पात्र रक्कम रुपये २४१००/-

२१८. **मालमत्ता कर विभाग - धनादेश रद्द झालेबाबत**

वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या वसई विभागीय कार्यालयातील सन २०१३-१४ या वित्तीय वर्षातील मालमत्ता कर विभागाचे लेखापरिक्षण केले असता **परिशिष्ट क्र.२०७ (पृष्ठ क्र.२७०)** मध्ये दर्शविल्याप्रमाणे मालमत्ताधारकांनी मालमत्ता कराचा भरणा धनादेशाद्वारे केला असून सदर धनादेश बँकेकडून विविध कारणे नमूद करुन परत आल्यामुळे संबंधित मालमत्ताधारकांनी मालमत्ता कराची रक्कम दंडासहीत महानगरपालिका निधीमध्ये जमा करावयाची आहे. परंतु परिशिष्टामध्ये नमूद केल्याप्रमाणे मालमत्ता कराची एकूण रक्कम रु.४८१८२/- व धनादेश वटणावळ फी रक्कम रु.८७५/- अशी एकूण रक्कम रु.४९०५७/- महानगरपालिका निधीमध्ये जमा केल्याचे दिसून येत नाही. करिता संबंधीत मालमत्ताधारकांकडून वरील रकमेची व्याजासहित वसुली करुन महानगरपालिका फंडात जमा करुन तसा अहवाल लेखापरिक्षणास सादर करावा.

वसूल पात्र रक्कम रुपये ४९०५७/-

२१९. **बांधकाम विभाग - सुरक्षा अनामत कमी भरणा केले बाबत**

कामाचे नांव :- वॉर्ड क्र. ८० मधील उमेळा तलाव ते एल.वाय. वर्तक यांच्या घरापर्यंत आर.सी.सी. पाईप गटार बांधणे.

ठेकेदाराचे नांव :- विशाल मनोहर चौधरी

एम.बी. क्र. :- १७९ पृष्ठ क्र. ५१-५५ प्र.क्र. :- १४७

एकूण बिलाची रक्कम :- रु. ३८५३९३/-

वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या वसई विभागीय कार्यालयातील सन २०१३-१४ या वित्तीय वर्षातील बांधकाम विभागाचे लेखापरीक्षण केले असता उपरोक्त नमूद मोजमाप नोंदवही क्र.१७९ मध्ये अनियमितता झाल्याचे आढळून आले आहे. मोजमाप नोंदवही क्र.१७९ मधील उपरोक्त दर्शविलेल्या प्रकरणी एकूण बिलाची रक्कम रु.३८५३९३/- वर ठेकेदाराकडून कपात करावयाची सुरक्षा अनामतीची ५ टक्के रक्कम रु.१२२७०/- नमूद केली आहे. परंतु प्रत्यक्षात सदर बिलाच्या रक्कमेवर सुरक्षा अनामतीची ५ टक्क्यांनुसार येणारी रक्कम रु.१९२७०/- असून रक्कम रु.७०००/- ची तफावत दिसून येते. तरी सदर ठेकेदाराकडून कमी कपात केलेली सुरक्षा अनामतीची रक्कम

रु.७०००/- संबंधीत ठेकेदाराकडून वसूल करुन महानगरपालिका निधीत जमा करावी व झालेल्या अनियमिततेबाबत साधार खुलासा करुन लेखापरीक्षणास अनुपालन दाखवावे.

वसुलपात्र रक्कम रु.७०००/-

२२०. **बांधकाम विभाग - मोजमाप नोंदवहीतील अनियमिततेबाबत.**

कामाचे नांव :- वॉर्ड क्र. ७२ मधील गिरीज कार्यालयाच्या पाठीमागे चार शीट शौचालय बांधणे.
ठेकेदाराचे नांव :- मे. अभिजीत भोईर
एम.बी. क्रमांक :- ७४, पान क्र. ९० ते १००

प्रभाग समिती ई कार्यालयामार्फत वॉर्ड क्र.७२ मध्ये गिरीज कार्यालयाच्या पाठीमागे ४ शीट शौचालय बांधकामाची निविदा प्रसिध्द केली होती. सदर जाहीर निविदा प्रसिध्द केल्यानंतर सदर कामासाठी तुलनात्मक तक्त्यातील तुलनेनुसार मे. अभिजीत भोईर यांस सदर कामासाठी कार्यादेश देण्यात आला होता. सदर कामाच्या नस्तीचे मोजमाप नोंदवहीसोबत पडताळणी केली असता बाब क्र.२ Providing dry trap rubble stone soling 15 cm to 20 cm thick including hand packing and compacting मध्ये मोजमाप नोंदवहीनुसार प्रत्यक्षामध्ये 5.85 cm ऐवजी 6.91 cm ची नोंद घेण्यात आली आहे. त्यामुळे तफावत 1.06 cm ची नोंद जास्त घेण्यात आल्यामुळे त्यांना प्रत्यक्षात 1.06 x 734.98 rate= 779.08 जादा रक्कम अदा केल्याचे दिसून येते. त्याचप्रमाणे बाब क्र. ४ Providing second class brick masonry with convention मध्ये मोजमाप नोंदवहीनुसार प्रत्यक्षामध्ये 11.47 cm ऐवजी 13.71 cm ची नोंद घेण्यात आली आहे. त्यामुळे तफावत 2.24 cm ची नोंद जास्त घेण्यात आल्यामुळे त्यांना प्रत्यक्षात 2.24 x 3914.21 rate= 8767.83 जादा रक्कम अदा केल्याचे दिसून येते.
करिता संबंधीत ठेकेदाराकडून उपरोक्त बाब क्रमांकानुसार जादा अदा केलेली रक्कम रु. 779.08 + 8767.83 = 9546.91 वसुल करुन महानगरपालिका निधीमध्ये जमा केल्याचे लेखापरिक्षणास अनुपालन दाखवावे.

वसुलपात्र रक्कम रु.९५४६.९१/-

२२१. **बांधकाम विभाग - नस्तीमधील अनियमिततेबाबत**

वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या वसई विभागीय कार्यालयातील सन २०१३-१४ या वित्तीय वर्षातील बांधकाम विभागाच्या नस्तींचे लेखापरिक्षण केले असता करारनाम्यामध्ये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील अनुसूची ड प्रकरण ५ मधील अनुक्रमांक २ नुसार महानगरपालिकेच्या सचिवाच्या अभिरक्षेत असलेली सामान्य मुद्रा प्रत्येक संविदेवर लावणे, स्थायी समितीचे दोन सदस्य व उपायुक्त दर्जापेक्षा कमी नसलेला कोणताही अधिकारी यांचे उपस्थितीत करारपत्र लावण्यात आली पाहिजेत. प्रस्तुत प्रकरणी **परिशिष्ट क्र.२०८ (पृष्ठ क्र.२७०)** मध्ये दर्शविल्यानुसार याप्रकारची कोणतीही बाब लेखापरिक्षणास निदर्शनास आढळून आली नाही. तसेच कार्यादेश व तुलनात्मक तक्ताही जोडण्यात आलेला नाही. करिता झालेल्या अनियमिततांची पूर्तता करुन लेखापरीक्षणास अनुपालन सादर करावे.

२२२. **पाणीपट्टी कराच्या थकबाक्या पुढील वर्षाच्या मागणी नोंदवहीत न ओढल्याबाबत.**

वसई विरार शहर महानगरपालिकेच्या वसई विभागीय कार्यालयाचे सन २०१३-१४ या वित्तीय वर्षामधील पाणीपुरवठा विभागातील पाणीपट्टी कराच्या मागणी नोंदवहीचे लेख्यांची तपासणी केली असता महाराष्ट्र नगरपरिषद लेखासहिंता १९७१ मधील नियम ७६ (२) मध्ये नमुद केल्यानुसार सन २०१२-१३ अखेरच्या थकबाक्या सन २०१३-१४ च्या मागणी नोंदवहीत कमी/जादा ओढल्याचे लेखापरिक्षणात आढळून आले आहे. सोबत **परिशिष्ट क्र.२०९ (पृष्ठ क्र.२७० ते २७१)** जोडले आहे. कमी ओढलेली रक्कम रु. १२३५५/- इतकी असून जादा ओढलेली रक्कम रु.८४०/- इतकी आहे. सदरची सन २०१२-१३ अखेरची थकबाकीची रक्कम कमी ओढल्याने ती कायम स्वरुपी लेख्यातून बाहेर जाण्याची शक्यता आहे. तेव्हा सन २०१२-१३ अखेरच्या सदर थकबाकीच्या रक्कमा मागणी नोंदवहीत न ओढल्याबाबत खुलासा करुन त्या रकमा खातेदाराच्या मागणी नोंदवहीत नोंदी घेऊन वसूलीची कार्यवाही करावी. उपरोक्त अनियमितता उदाहरणे दाखल देण्यात आले असून त्याचा तपशिल सोबत जोडलेल्या विवरणपत्रकात देण्यात आलेला आहे. उर्वरीत मागणी नोंदवहीतील थकबाकी धारकाच्या थकबाक्या पुढील वर्षात ओढल्या वा कसे याबाबतची खात्री करुन मेळ घेण्यात यावा. तसेच या वर्षाची व मागील वर्षाची मागणी नोंदवही यातून मागणी विषयक नोंदी अचूकपणे पुढे ओढण्यात आल्या आहेत का? याबाबत खात्री करुन तत्कालीन सक्षम प्राधिकृत अधिकाऱ्याकडून तसे प्रमाणित करुन घेऊन या बाबत साधार खुलासा करावा व लेखापरीक्षणास अनुपालन दाखवावे.

वसुलपात्र रक्कम रु.१२३५५/-

२२३.**मालमत्ता कराची मागणी व कर निर्धारण सुचीच्या मागणी मध्ये असलेल्या तफावती बाबत : -**

वसई विरार शहर महानगरपालिकेच्या वसई विभागीय कार्यालयाचे सन २०१३-१४ या वित्तीय वर्षातील मालमत्ता कर विभागातील कर निर्धारण सुची व मागणी नोंदवहीची पडताळणी करीत असता महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता १९७१ च्या नियम क्र ७५ नुसार व नियम क्र. ७६ च्या १ व ४ अन्वये कर निर्धारण सुचीमध्ये दर्शवलेली मागणी व मागणी नोंदवही नमुना नं.४७ मध्ये दर्शविलेली मागणी हयामध्ये कमी/जास्त रक्कम ओढल्याचे लेखा परिक्षणात आढळून आले आहे. सोबत **परिशिष्ट क्र.२१० (पृष्ठ क्र.२७१)** जोडले आहे. हयाबाबत झालेल्या अनियमीतते बाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यांत येत आहे.

कर निर्धारण सुची नोंदवही नमुना नं.४३ मध्ये नोंद केलेले दिसून येत आहे. पंरतु प्रत्यक्षात सदरच्या मागणीची नोंद नमुना नं.४७ मध्ये कमी घेतल्याचे दिसून येत आहे. प्रत्यक्षात निर्धारण सुची पूर्ण आणि अधिप्रमाणित झाल्यावर लगेच त्या वर्षामध्ये मागणी पुस्तक उघडण्यात आले पाहिजे व तश्या नोंदी मागणी नोंदवहीत घेतल्या पाहिजेत. वित्तीय वर्षाअखेर मागणी पुस्तकांच्या सर्व नोंदी पूर्ण झाल्यावर त्याच्या प्रत्येक पानांवरील रक्कमेच्या बेरजा करुन शेवटच्या पानांवर अग्रेषीत कराव्यात व त्या मागणी पुस्तकांवर संबंधित प्राधिकृत अधिकाऱ्याने साक्षांकित केले पाहिजे. परंतु सदरच्या नोंदी साक्षांकीत प्राधिकृत अधिकाऱ्यांने न केल्याचे लेखापरिक्षणात आढळून आले आहे. तरी याबाबत खुलासा करावा व झालेल्या अनियमिततेची पूर्तता करुन लेखापरिक्षणास अनुपालन दाखवावे.

वसूल पात्र रक्कम रुपये २३२७/-

२२४.**मालमत्ता हस्तांतरणाबाबत :-**

वसई विरार शहर महानगरपालिकेच्या वसई विभागीय कार्यालयाचे सन २०१३-१४ या वित्तीय वर्षामधील मालमत्ता कर विभागातील कर निर्धारण नोंदवही नमुना क्र.४३ मध्ये मिळकतीचे हस्तांतरण केलेल्या नस्तीचे लेखापरिक्षण केले असता खालीलप्रमाणे अनियमितता झाल्याचे आढळून आले आहे.

परिशिष्ट क्र.२११ (पृष्ठ क्र.२७१) मध्ये सादर केलेल्या मालमत्ता धारकाच्या नावात किंवा मालमत्ता हस्तांतरण करतेवेळी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमामधील अनुसूची "ड" नुसार प्रकरण ८ नियम २० अन्वये व नियम ४६९ अन्वये उप-आयुक्त यांची मंजूरी घेऊन मालमत्ता हस्तांतरण केले नाही. तसेच मालमत्ता हस्तांतरण करतेवेळी परिशिष्टामध्ये सादर केल्याप्रमाणे मालमत्ता धारकांच्या नस्तीसोबत मालमत्ता कर पावती, पेपर नोटीस, करारनामे, मालमत्ता धारकाचा मृत्यु झाला असल्यास मृत्यु दाखला जोडल्याचे दिसून आले नाही. त्याचप्रमाणे वारसा हक्क प्रकरणी प्रतिज्ञापत्र जोडलेले नाही.. तरी ह्या झालेल्या अनियमिततेबाबत साधार खुलासा करावा. तसेच अनियमिततेची पूर्तता करुन लेखापरिक्षणास अनुपालन करावे.

२२५.**मंजूर नस्ती प्रमाणे नविन कर आकारणी न केल्याबाबत :-**

वसई विरार शहर महानगरपालिकेच्या वसई विभागीय कार्यालयाचे सन २०१३-१४ या वित्तीय वर्षातील मालमत्ता कर विभागातील नविन कर आकारणी नस्तीचे लेखा परिक्षण केले असता खालीलप्रमाणे अनियमीतता झाल्याचे लेखापरिक्षणास आढळून आले आहे.

परिशिष्ट क्र.२१२ (पृष्ठ क्र.२७२) दर्शविल्याप्रमाणे मंजूर नस्तीनुसार प्रकरणी मंजूर दिनांकापासून कर आकारणी करण्यात आली पाहिजे. परंतु परिशिष्ट क्रमांकामध्ये दर्शविलेल्या मालमत्ताधारकांची नविन कर आकारणी कर विभागाने सन २०१३-१४ या वित्तीय वर्षापासून केल्यामुळे महानगरपालिकेचे आर्थिक उत्पन्न बुडल्याने रक्कम रु.२०७२५३/- नुकसान झाल्याचे लेखापरिक्षणास आढळून आले आहे. करिता संबंधित मालमत्ताधारकांकडून सदरची रक्कम रु. २०७२५३/- वसुल करुन ह्या झालेल्या अनियमिततेबाबत साधार खुलासा करुन लेखापरिक्षणास अनुपालन दाखवावे.

वसूल पात्र रक्कम रुपये २०७२५३/-

२२६.**नविन कर आकारणी – नस्तीमधील अनियमिततेबाबत :-**

वसई विरार शहर महानगरपालिकेच्या वसई विभागीय कार्यालयाचे सन २०१३-१४ या वित्तीय वर्षातील मालमत्ता कर विभागातील नविन कर आकारणी नस्तीचे लेखा परिक्षण केले असता खालील प्रमाणे अनियमीतता झाल्याचे लेखापरिक्षणास आढळून आले आहे.

परिशिष्ट क्र.२१३ (पृष्ठ क्र.२७२ ते २७३) मधील सादर केलेल्या मालमत्ता क्रमांकानूसार मालमत्ताधारकास नविन कर आकारणी करते वेळी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या २६७ (अ) नुसार कार्यवाही केल्याचे लेखापरिक्षणात आढळून आले आहे. परंतु नस्तीमध्ये प्रत्यक्ष पाहणी अहवाल, अनधिकृत बांधकामाबाबत प्रतिज्ञापत्र, वास्तु विशारदाचे प्रमाणपत्र उपलब्ध नसल्याचे आढळून आले आहे. तरी ह्या झालेल्या अनियमिततेबद्दल संबंधित व्यक्तिवर जबाबदारी निश्चित करुन नस्तींची पूर्तता करावी व लेखापरिक्षणास अनुपालन दाखवावे.

२२७. **वसई प्रभाग कार्यालय ई चे वित्तीय कामाबाबत**

आयुक्त, वसई-विरार शहर महानगरपालिका यांचेकडील आदेश क्र. आस्था/७३८/२०१२, दिनांक १७/०१/२०१२ अन्वये महानगरपालिकेच्या ५ प्रभाग समित्यांना लेखा विषयक अधिकार प्रदान करण्यात आले आहेत.

त्यानुसार प्रभाग समिती निहाय लेखा विषयक कामकाज पार पाडण्याकरिता मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ८४(१) नुसार लेखापाल/वरिष्ठ लेखा लिपिक यांना प्राधिकृत करण्यात आले आहे.

तसेच महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता १९७१ मधील तरतुदीनुसार प्रभाग समितीचे संपूर्ण लेखा विषयक कामकाज प्रभाग समिती मार्फत पार पाडले जाईल. त्यासाठी मुख्य निधीतून प्रत्येक प्रभागास वेळोवेळी ठराविक रक्कम वर्ग करण्यात आली आहे. प्रभाग समित्यांच्या अधिकाऱ्यांनी निधी निहाय स्वतंत्र लेखे ठेवायचे आहे. बँक खात्याचे व्यवहार प्रभाग कार्यालयापुरते मर्यादित ठेवले आहेत. बँक खात्याचे व्यवहार करण्याचे अधिकार संबंधीत उपायुक्त व प्रभागाचा लेखापाल/वरिष्ठ लेखा लिपिकास दिले आहेत. त्यासाठी वेतन भत्ते, शासकीय देणी, विद्युत दूरध्वनी, डिझेल खर्च, इतर कामांचा खर्च इत्यादी व विकास कामांबाबत रक्कम रु.५.२५ लाख पर्यंतच्या खर्चाची मर्यादा घालून दिली आहे. तसेच कोणत्याही कामाचे एकापेक्षा अधिक भाग करुन खर्च करता येणार नाही. तसेच सर्व प्रदाने ई.सी.एस. द्वारे करावयाची आहेत. विहीत वित्तीय मर्यादेत नसणारी सर्व प्रदाने मुख्य लेखाधिकारी व आयुक्त यांच्या संयुक्त स्वाक्षरीने करावयाची आहेत.

वसई प्रभाग कार्यालय ई चे कामाबाबत :-

वसई प्रभाग कार्यालयाने वित्तीय वर्ष २०१३-१४ करिता पुढीलप्रमाणे रोखवह्या ठेवल्या आहेत.

१) सर्वसाधारण रोखवही
२) अनामत रोखवही
३) भविष्य निर्वाह निधीची रोखवही
४) निवृत्ती वेतन रोखवही
५) परिभाषिक अंशदान निवृत्तीवेतन रोखवही
६) पाणी पुरवठा रोखवही

प्रभागाने केलेल्या संबंधीत नोंदवह्या तपासल्या असून लेखापरिक्षणाचे अभिप्राय पुढीलप्रमाणे देण्यात येत आहेत.

दि.३१/०३/२०१४ अखेर शिल्लक रकमा खालीलप्रमाणे आहेत:-

अ. क्र.	खात्याचे नांव	बँकेचे नांव	खाते क्र.	रोकडवहीनुसार शिल्लक	पासबुकानुसार शिल्लक	तफावत
१	सर्वसाधारण खाते	बँक ऑफ महाराष्ट्र	६००९०७०५५६४	३६२५९५२७	७०८७७६५०	३४६१८१२३
२	पाणी पुरवठा	बँक ऑफ महाराष्ट्र	६००९०७०७६९५	८८४८८६२	१११७१७६३	२३२२९०१
३	भविष्य निर्वाह निधी	बँक ऑफ महाराष्ट्र	६००९०७१०५२९	२५३९७८७.९७	२३८८१६३	१५१६२४.९७
४	निवृत्ती वेतन निधी	बँक ऑफ महाराष्ट्र	६००९०७०७१२००५	१६५९९४४.९५	७४२३९७	९१७५४७.९५
५	अनामत	बँक ऑफ महाराष्ट्र	६००९०७०७५६१	१७०४३९२०	१७२९३६२८	२४९७०८
६	परिभाषित अंशदान व निवृत्ती वेतन	बँक ऑफ महाराष्ट्र	६००९५८५१६७९	५१९६८६०	२९३५४१८	२२६१४४२
	एकूण			**७१५४८९०१.९२**	**१०५४०९०१९**	**४०५२१३४६.९२**

सबब रोखवहीप्रमाणे बँकेत दर्शविलेली शिल्लक रक्कम व बँकेच्या विवरणामधील शिल्लक रक्कम यामध्ये असलेली तफावत रक्कम रु. ४०५२१३४६.९२/- दिसून येत आहे.

रोखवहीतील शिल्लक व बँकेच्या पासबुकातील शिल्लक यांचा ताळमेळ महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता १९७१ नियम ४० व ५१ नुसार प्रत्येक महिन्याच्या अखेरीस घेणे बंधनकारक असताना, प्रभागाने प्रत्येक महिनाअखेर ताळमेळ घेतलेला नाही.

रोखवहीत ३१ मार्च २०१४ रोजी प्रभारी लेखापाल यांची सही आहे. परंतु महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता, १९७१ नियम ५१ नुसार रोखवहीतील लेखे रोजच्या रोज बंद करुन त्यावर प्राधिकृत अधिकाऱ्यांनी स्वाक्षरी केली नाही. माहे मार्च २०१४ मधील कोणत्याही दिवशी प्राधिकृत अधिकाऱ्याने स्वाक्षरी केली नाही.

बँक ताळमेळ पत्रकानुसार भविष्य निर्वाह निधी, निवृत्ती वेतन निधी, अनामत, परिभाषित अंशदान निवृत्ती निधी मध्ये असलेल्या शिल्लक रकमांची गुंतवणूक न केल्यामुळे महापालिकेचे व्याजापासून मिळणारे उत्पन्नाचे नुकसान झाल्याचे दिसून येते.

तसेच दरमहा कर्मचाऱ्याच्या मूळ वेतन अधिक ग्रेड पे या एकूण रकमेच्या १/९ प्रमाणे महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता १९७१ च्या नियम १३६ नुसार परिगणना करुन निवृत्ती वेतन अंशदान खात्यामध्ये जमा करणे क्रमप्राप्त आहे. प्रत्यक्ष रोकडवही तपासली असता परिगणना न करता ठराविक रक्कम त्या प्रभागामध्ये वर्ग करण्यात आलेली आहे. सदर बाब नियमबाह्य आहे.

त्याचप्रमाणे दरमहा कर्मचाऱ्यांच्या मूळ वेतन अधिक ग्रेड वेतन अधिक महागाई भत्ता या एकूण रकमेच्या १० टक्के प्रमाणे परिभाषित अंशदानाची परिगणना करुन येणारी रक्कम परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन निधी खात्यामध्ये जमा करणे क्रमप्राप्त आहे. प्रत्यक्ष रोकडवही तपासली असता परिगणना न करता ठराविक रक्कम त्या प्रभागामध्ये वर्ग करण्यात आलेली आहे. सदर बाब नियमबाह्य आहे.

तरी संबंधितांवर जबाबदारी निश्चित करुन या सर्व अनियमिततांची पूर्तता करावी व झालेल्या अनियमिततांबाबत साधार खुलासा करुन लेखापरिक्षणास अनुपालन दाखवावे.

वसई-विरार शहर महानगरपालिका
वसई विभागीय कार्यालया अंतर्गत नायगांव उपविभागीय कार्यालयाचा
दि. ०१ एप्रिल २०१३ ते दि. ३१ मार्च २०१४ पर्यंतचा लेखा परिक्षण अहवाल

२२८. **एकत्रित मालमत्ता कराच्या थकबाकी रक्कमे बाबत**

वसई विरार शहर महानगरपालिकेच्या वसई विभागीय कार्यालय अंतर्गत येणाऱ्या नायगांव उपविभागीय कार्यालयाचे सन २०१३-१४ या वित्तीय वर्षामधील मालमत्ता कर विभागाचे लेखापरिक्षण करीत असताना सदर लेखापरिक्षणामध्ये **परिशिष्ट क्र.२१४ (पृष्ठ क्र.२७३)** मध्ये दर्शविलेल्या एकत्रित मालमत्ता कर थकबाकी वसूली एकूण रक्कम रुपये ३६६५८७/- थकीत असल्याचे आढळून आले आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे अनुसूचि प्रकरण ८ मधील नियम ४२ अन्वये थकीत रकमा वसूली बाबत कार्यवाही करणे आवश्यक आहे. तथापि त्याप्रमाणे वसुलीची कार्यवाही केली नाही. तरी थकीत रक्कम महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ११ कराधान विभाग नियम १२८ नुसार थकबाकी रक्कम रुपये ३६६५८७/- व्याजासहीत वसूल करुन महानगरपालिका निधित जमा करावी. सदर एकत्रित मालमत्ता कर थकबाकीची रक्कम वेळीच वसूल होणे आवश्यक आहे. संबंधितांनी वेळीच एकत्रित मालमत्ता कर थकबाकी वसूली बाबत कार्यवाही का केली नाही ? याचा साधार खुलासा करुन लेखापरिक्षणास अनुपालन दाखवावे.

वसूल पात्र रक्कम रुपये ३६६५८७/-

२२९. **पाणीपट्टी कराच्या थकबाकी रक्कमे बाबत**

वसई विरार शहर महानगरपालिकेच्या वसई विभागीय कार्यालय अंतर्गत येणाऱ्या नायगांव उपविभागीय कार्यालयाचे सन २०१३-१४ या वित्तीय वर्षामधील पाणीपुरवठा विभागाचे लेखापरिक्षण करीत असताना सदर लेखापरिक्षणामध्ये **परिशिष्ट क्र.२१५ (पृष्ठ क्र.२७३)** मध्ये दर्शविलेल्या पाणीपट्टी व विशेष पाणीपट्टीची थकबाकी वसूली एकूण रक्कम रुपये २,४०,२८३/- थकीत असल्याचे आढळून आले आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे अनुसूचि प्रकरण ८ मधील नियम ४२ अन्वये थकीत रकमा वसूली बाबत कार्यवाही करणे आवश्यक आहे. तथापि त्याप्रमाणे वसुलीची कार्यवाही केली नाही. तरी थकीत रक्कम रुपये २४०२८३/- व्याजासहीत वसूल करुन महानगरपालिका निधित जमा करावी. सदर पाणीपट्टी थकबाकीची रक्कम वेळीच वसूल होणे आवश्यक आहे. संबंधितांनी वेळीच पाणीपट्टी थकबाकी वसूली बाबत कार्यवाही का केली नाही याचा साधार खुलासा करुन लेखापरिक्षणास अनुपालन दाखवावे.

वसूल पात्र रक्कम रुपये २४०२८३/-

२३०. **गाळा/भुई भाडे कराच्या वसुली बाबत**

वसई विरार शहर महानगरपालिकेच्या वसई विभागीय कार्यालया अंतर्गत येणाऱ्या नायगाव उपविभागीय कार्यालयाचे सन २०१३-१४ या वित्तीय कालावधीतील गाळा/भुई भाडे नोंदवहीचे लेखापरिक्षण केले असता सदर गाळा गाळा/भुई भाडे नोंदवही महाराष्ट्र नगरपरिषदा लेखासंहिता १९७१ च्या नियम क्र.११० च्या नमुना क्र.८१ प्रमाणे नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. सदर नोंदवहीमध्ये रोजच्या रोज जमा होणाऱ्या रकमांचे नोंदी घेणे आवश्यक आहे. परंतु संबंधीत विभागाने सदर नोंदवही नमुन्यामध्ये न ठेवल्याचे व एकत्रित गोषवारा न काढल्याचे आढळून आले आहे. तसेच **परिशिष्ट क्र.२१६ (पृष्ठ क्र.२७४)** मध्ये दर्शविलेली गाळा/भुई भाड्याची रक्कम रुपये ८७८८००/- थकीत असल्याचे आढळून आले आहे. करिता सदरची थकीत रक्कम रु. ८७८८००/- मात्र व्याजासह वसुल करुन

महानगरपालिका निधीत जमा केल्याचे, तसेच मागणी नोंदवही लेखासंहितेतील नमुन्यानुसार अद्ययावत करुन प्राधिकृत अधिका-यांची स्वाक्षरी घेऊन लेखा परीक्षणास अनुपालन दाखवावे.

वसूल पात्र रक्कम रु. ८७८८००/-

२३१. **कर निर्धारण नोंदवही मध्ये मालमत्ता कराच्या रकमेची नोंद न केल्याबाबत**

वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या वसई विभागीय कार्यालयांतर्गत नायगांव उपविभागीय कार्यालयाचे सन २०१३-१४ या वित्तीय वर्षामधील मालमत्ता कर विभागातील मागणी नोंदवहीची कर निर्धारण नोंद सोबत पडताळणी करीत असता **परिशिष्ठ क्र.२१७ (पृष्ठ क्र.२७४)** मध्ये दर्शविलेल्या मालमत्ता कराची मागणीची नोंद महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता १९७१ च्या नियम क्र. ७६ मधील नमुना क्र. ४७ मध्ये मालमत्त्याची नोंद झाल्याचे आढळून आलेले आहे. परतु सदर मालमत्तेची नोंद प्रथम कर निर्धारण सुची नमुना क्र. ४३ मध्ये होणे आवश्यक होते. परंतु अश्या प्रकारची नोंद न झाल्यामुळे सदर मालमत्ता कराच्या रक्कमा लेखा बाहेर असल्याची दिसून आले आहे. त्यामुळे सदर मालमत्याची कर आकारणी झाली आहे की कसे हया बाबतची लेखा परिक्षणात खात्री करता आली नाही. करीता तरी सदर झालेल्या अनुमिततेबाबत साधार खुलासा करुन लेखापरीक्षणास अनुपालन दाखवावे.

२३२. **एकत्रित मालमत्ता कराच्या थकबाक्या पुढील वर्षाच्या मागणी नोंदवहीत न ओढल्याबाबत.**

वसई विरार शहर महानगरपालिकेच्या वसई विभागीय कार्यालय अंतर्गत येणाऱ्या नायगांव उपविभागीय कार्यालयाचे सन २०१३-१४ या वित्तीय वर्षामधील मालमत्ता कर विभागाच्या मागणी नोंदवहीचे लेख्यांची तपासणी केली असता महाराष्ट्र नगरपरिषद लेखासहिंता १९७१ मधील नियम ७६ (२) मध्ये नमुद केल्यानुसार सन २०१२-१३ अखेरच्या थकबाक्या सन २०१३-१४ च्या मागणी नोंदवहीत कमी/जास्त ओढल्याचे लेखापरिक्षणात आढळून आले आहे. सोबत **परिशिष्ट क्र.२१८ (पृष्ठ क्र.२७४)** जोडले आहे. कमी ओढलेली रक्कम रु. २३१७/- इतकी असून जादा ओढलेली रक्कम रु.२८८२/- इतकी आहे. सन २०१२-१३ अखेरची थकबाकीची रक्कम रु.२३१७/- कमी ओढल्याने ती कायम स्वरुपी लेख्यातून बाहेर जाण्याची शक्यता आहे. तेव्हा सदर सन २०१२-१३ अखेरच्या थकबाकीच्या रक्कमा मागणी नोंद वहीत न ओढल्याबाबत खुलासा करुन त्या रकमा खातेदाराच्या मागणी नोंदवहीत नोंदी घेऊन त्यांच्याकडून वसूलीची कार्यवाही करावी. तसेच सदरची मागणी रक्कम कमी/जादा का आली याबाबत खुलासा करावा. उपरोक्त अनियमीतता उदाहरणे दाखल देण्यात आले असून त्याचा तपशिल सोबत जोडलेल्या विवरणपत्रकात देण्यात आलेला आहे. उर्वरीत मागणी नोंदवहीतील थकबाकी धारकाच्या थकबाक्या पुढील वर्षात ओढल्या व कसे याबाबतची खात्री करुन मेळ घेण्यात यावा. तसेच या वर्षाची व मागील वर्षाची मागणी नोंदवही यातून मागणी विषयक नोंदी अचूकपणे पुढे ओढण्यात आल्या आहेत का? याबाबत खात्रीकरुन तत्कालीन सक्षम प्राधिकृत अधिकाऱ्याने तसे प्रमाणित करणे आवश्यक असताना मागणी नोंदवही प्रमाणित केली नसल्याचे आढळून आले आहे. तरी या बाबत खुलासा करुन लेखापरिक्षणास अनुपालन दाखवावे.

वसुलपात्र रक्कम रु. २३१७/-

२३३. **मालमत्ता कराची मागणी व कर निर्धारण सुचीच्या मागणी मध्ये असलेल्या तफावती बाबत : -**

वसई विरार शहर महानगरपालिकेच्या वसई विभागीय कार्यालयांतर्गत नायगांव उपविभागीय कार्यालयाचे सन २०१३-१४ या वित्तीय वर्षातील मालमत्ता कर विभागातील कर निर्धारण सुची व मागणी नोंदवहीची पडताळणी करीत असता महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता १९७१ च्या नियम क्र ७५ नुसार व नियम क्र. ७६ च्या १ व ४ अन्वये कर निर्धारण सुचीमध्ये दर्शवलेली मागणी व मागणी नोंदवही नमुना नं.४७ मध्ये दर्शविलेली मागणी हयामध्ये कमी/जास्त रक्कम ओढल्याचे लेखा परिक्षणात आढळून आले आहे. सोबत **परिशिष्ट क्र.२१९ (पृष्ठ क्र.२७५)** जोडले आहे. हयाबाबत झालेल्या अनियमीतते बाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यांत येत आहे.

कर निर्धारण सुची नोंदवही नमुना नं.४३ मध्ये नोंद केलेले दिसून येत आहे. पंरतु प्रत्यक्षात सदरच्या मागणीची नोंद नमुना नं.४७ मध्ये कमी घेतल्याचे दिसून येत आहे. प्रत्यक्षात निर्धारण सुची पूर्ण आणि अधिप्रमाणित झाल्यावर लगेच त्या वर्षामध्ये मागणी पुस्तक उघडण्यात आले पाहिजे व तश्या नोंदी मागणी नोंदवहीत घेतल्या पाहिजेत. वित्तीय वर्षाअखेर मागणी पुस्तकांच्या सर्व नोंदी पूर्ण झाल्यावर त्याच्या प्रत्येक पानांवरील रक्कमेच्या बेरजा करुन शेवटच्या पानांवर अग्रेषीत कराव्यात व त्या मागणी पुस्तकांवर संबंधित प्राधिकृत अधिकाऱ्याने साक्षांकित केले पाहिजे. परंतु सदरच्या नोंदी साक्षांकीत प्राधिकृत अधिकाऱ्यांने न केल्याचे लेखापरिक्षणात आढळून आले आहे. तरी याबाबत खुलासा करुन लेखापरिक्षणास अनुपालन दाखवावे.

२३४. **पाणीपट्टी कराची थकबाकी पुढील वर्षाच्या मागणी नोंदवहीत न ओढल्याबाबत**

वसई विरार शहर महानगरपालिकेच्या वसई विभागीय कार्यालय अंतर्गत येणाऱ्या नायगांव उपविभागीय कार्यालयाचे सन २०१३-१४ या वित्तीय वर्षामधील पाणीपुरवठा विभागाच्या मागणी नोंदवहीचे लेख्यांची तपासणी केली असता महाराष्ट्र नगरपरिषद लेखासहिंता १९७१ मधील नियम ७६ (२) मध्ये नमुद केल्यानुसार सन २०१२-१३ अखेरच्या

थकबाक्या सन २०१२-१३ च्या मागणी नोंदवहीत कमी/जास्त ओढल्याचे लेखापरिक्षणात आढळून आले आहे. सोबत **परिशिष्ट क्र.२२० (पृष्ठ क्र.२७६)** जोडले आहे. कमी ओढलेली रक्कम रु. ३०००/- इतकी असून जादा ओढलेली रक्कम रु.३८१६/- इतकी आहे. सन २०१२-१३ अखेरची थकबाकीची रक्कम रु.३०००/- कमी ओढल्याने ती कायम स्वरुपी लेख्यातून बाहेर जाण्याची शक्यता आहे. तेव्हा सदर सन २०१२-१३ अखेरच्या थकबाकीच्या रक्कमा मागणी नोंद वहीत न ओढल्याबाबत खुलासा करुन त्या रकमा खातेदाराच्या मागणी नोंदवहीत नोंदी घेऊन त्यांच्याकडून वसूलीची कार्यवाही करावी. उपरोक्त अनियमीतता उदाहरणे दाखल देण्यात आले असून त्याचा तपशिल सोबत जोडलेल्या विवरणपत्रकात देण्यात आलेला आहे. उर्वरीत मागणी नोंदवहीतील थकबाकी धारकाच्या थकबाक्या पुढील वर्षात ओढल्या व कसे याबाबतची खात्री करुन मेळ घेण्यात यावा. तसेच या वर्षाची व मागील वर्षाची मागणी नोंदवही यातून मागणी विषयक नोंदी अचूकपणे पुढे ओढण्यात आल्या आहेत का? याबाबत खात्रीकरुन तत्कालीन सक्षम प्राधिकृत अधिकाऱ्याने तसे प्रमाणित करणे आवश्यक असताना मागणी नोंदवही प्रमाणित केली नसल्याचे आढळून आले आहे. तरी या बाबत खुलासा करुन लेखापरिक्षणास अनुपालन दाखवावे.

वसुलपात्र रक्कम रु. ३०००/-

वसई-विरार शहर महानगरपालिका
वसई विभागीय कार्यालय अंतर्गत वडवली उपविभागीय कार्यालयाचा
दि. १ एप्रिल २०१३ ते दि. ३१ मार्च २०१४ पर्यंतचा लेखा परिक्षण अहवाल

२३५.**एकत्रित मालमत्ता कराच्या थकबाकी रक्कमे बाबत**

वसई विरार शहर महानगरपालिकेच्या वसई विभागीय कार्यालय अंतर्गत येणाऱ्या वडवली उपविभागीय कार्यालयाचे सन २०१३-१४ या वित्तीय वर्षामधील मालमत्ता कर विभागाचे लेखापरिक्षण करीत असताना सदर लेखापरिक्षणामध्ये **परिशिष्ट क्र.२२१ (पृष्ठ क्र.२७६)** मध्ये दर्शविलेल्या एकत्रित मालमत्ता कर थकबाकी वसूली एकूण रक्कम रुपये ३६४६४८/- थकीत असल्याचे आढळून आले आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे अनुसूचि प्रकरण ८ मधील नियम ४२ अन्वये थकीत रकमा वसूली बाबत कार्यवाही करणे आवश्यक आहे. तथापि त्याप्रमाणे वसुलीची कार्यवाही केली नाही. तरी थकीत रक्कम महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ११ कराधान विभाग नियम १२८ नुसार थकबाकी रक्कम रुपये ३६४६४८/- व्याजासहीत वसूल करुन महानगरपालिका निधित जमा करावी. सदर एकत्रित मालमत्ता कर थकबाकीची रक्कम वेळीच वसूल होणे आवश्यक आहे. संबंधितांनी वेळीच एकत्रित मालमत्ता कर थकबाकी वसूली बाबत कार्यवाही का केली नाही ? याचा साधार खुलासा करुन लेखापरिक्षणास अनुपालन दाखवावे.

वसूल पात्र रक्कम रुपये ३६४६४८/-

वसई-विरार शहर महानगरपालिका
वसई विभागीय कार्यालय अंतर्गत मुळगांव उपविभागीय कार्यालयाचा
दि. ०१ एप्रिल २०१३ ते दि. ३१ मार्च २०१४ पर्यंतचा लेखा परिक्षण अहवाल

२३६.**एकत्रित मालमत्ता कराच्या थकबाकी रक्कमे बाबत**

वसई विरार शहर महानगरपालिकेच्या वसई विभागीय कार्यालय अंतर्गत येणाऱ्या मुळगांव उपविभागीय कार्यालयाचे सन २०१३-१४ या वित्तीय वर्षामधील मालमत्ता कर विभागाचे लेखापरिक्षण करीत असताना सदर लेखापरिक्षणामध्ये **परिशिष्ट क्र.२२२ (पृष्ठ क्र.२७६)** मध्ये दर्शविलेल्या एकत्रित मालमत्ता कर थकबाकी वसूली एकूण रक्कम रुपये ५०२६०९/- थकीत असल्याचे आढळून आले आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे अनुसूचि प्रकरण ८ मधील नियम ४२ अन्वये थकीत रकमा वसूली बाबत कार्यवाही करणे आवश्यक आहे. तथापि त्याप्रमाणे वसुलीची कार्यवाही केली नाही. तरी थकीत रक्कम महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ११ कराधान विभाग नियम १२८ नुसार थकबाकी रक्कम रुपये ५०२६०९/- व्याजासहीत वसूल करुन महानगरपालिका निधित जमा करावी. सदर एकत्रित मालमत्ता कर थकबाकीची रक्कम वेळीच वसूल होणे आवश्यक आहे. संबंधितांनी वेळीच एकत्रित मालमत्ता कर थकबाकी वसूली बाबत कार्यवाही का केली नाही ? याचा साधार खुलासा करुन लेखापरिक्षणास अनुपालन दाखवावे.

वसूल पात्र रक्कम रुपये ५०२६०९/-

वसई-विरार शहर महानगरपालिका
वसई विभागीय कार्यालय अंतर्गत किरवली उपविभागीय कार्यालयाचा
दि. ०१ एप्रिल २०१३ ते दि. ३१ मार्च २०१४ पर्यंतचा लेखा परिक्षण अहवाल

२३७. **एकत्रित मालमत्ता कराच्या थकबाकी रक्कमे बाबत**

वसई विरार शहर महानगरपालिकेच्या वसई विभागीय कार्यालय अंतर्गत येणाऱ्या किरवली उपविभागीय कार्यालयाचे सन २०१३-१४ या वित्तीय वर्षामधील मालमत्ता कर विभागाचे लेखापरिक्षण करीत असताना सदर लेखापरिक्षणामध्ये **परिशिष्ट क्र.२२३ (पृष्ठ क्र.२७७)** मध्ये दर्शविलेल्या एकत्रित मालमत्ता कर थकबाकी वसूली एकूण रक्कम रुपये **१६५९८/-** थकीत असल्याचे आढळून आले आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे अनुसूचि प्रकरण ८ मधील नियम ४२ अन्वये थकीत रकमा वसूली बाबत कार्यवाही करणे आवश्यक आहे. तथापि त्याप्रमाणे वसुलीची कार्यवाही केली नाही. तरी थकीत रक्कम महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ११ कराधान विभाग नियम १२८ नुसार थकबाकी रक्कम रुपये **१६५९८/-** व्याजासहीत वसूल करुन महानगरपालिका निधित जमा करावी. सदर एकत्रित मालमत्ता कर थकबाकीची रक्कम वेळीच वसूल होणे आवश्यक आहे. संबंधितांनी वेळीच एकत्रित मालमत्ता कर थकबाकी वसूली बाबत कार्यवाही का केली नाही ? याचा साधार खुलासा करुन लेखापरिक्षणास अनुपालन दाखवावे.

वसूल पात्र रक्कम रुपये १६५९८/-

वसई-विरार शहर महानगरपालिका
वसई विभागीय कार्यालय अंतर्गत चोबारे उपविभागीय कार्यालयाचा
दि. ०१ एप्रिल २०१३ ते दि. ३१ मार्च २०१४ पर्यंतचा लेखा परिक्षण अहवाल

२३८. **एकत्रित मालमत्ता कराच्या थकबाकी रक्कमे बाबत**

वसई विरार शहर महानगरपालिकेच्या वसई विभागीय कार्यालय अंतर्गत येणाऱ्या चोबारे उपविभागीय कार्यालयाचे सन २०१३-१४ या वित्तीय वर्षामधील मालमत्ता कर विभागाचे लेखापरिक्षण करीत असताना सदर लेखापरिक्षणामध्ये **परिशिष्ट क्र.२२४ (पृष्ठ क्र.२७७)** मध्ये दर्शविलेल्या एकत्रित मालमत्ता कर थकबाकी वसूली एकूण रक्कम रुपये **५५६८८/-** थकीत असल्याचे आढळून आले आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे अनुसूचि प्रकरण ८ मधील नियम ४२ अन्वये थकीत रकमा वसूली बाबत कार्यवाही करणे आवश्यक आहे. तथापि त्याप्रमाणे वसुलीची कार्यवाही केली नाही. तरी थकीत रक्कम महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ११ कराधान विभाग नियम १२८ नुसार थकबाकी रक्कम रुपये **५५६८८/-** व्याजासहीत वसूल करुन महानगरपालिका निधित जमा करावी. सदर एकत्रित मालमत्ता कर थकबाकीची रक्कम वेळीच वसूल होणे आवश्यक आहे. संबंधितांनी वेळीच एकत्रित मालमत्ता कर थकबाकी वसूली बाबत कार्यवाही का केली नाही ? याचा साधार खुलासा करुन लेखापरिक्षणास अनुपालन दाखवावे.

वसूल पात्र रक्कम रुपये ५५६८८/-

वसई-विरार शहर महानगरपालिका
वसई विभागीय कार्यालय अंतर्गत सांडोर उपविभागीय कार्यालयाचा
दि. ०१ एप्रिल २०१३ ते दि. ३१ मार्च २०१४ पर्यंतचा लेखा परिक्षण अहवाल

२३९. **एकत्रित मालमत्ता कराच्या थकबाकी रक्कमे बाबत**

वसई विरार शहर महानगरपालिकेच्या वसई विभागीय कार्यालय अंतर्गत येणाऱ्या सांडोर उपविभागीय कार्यालयाचे सन २०१३-१४ या वित्तीय वर्षामधील मालमत्ता कर विभागाचे लेखापरिक्षण करीत असताना सदर लेखापरिक्षणामध्ये **परिशिष्ट क्र.२२५ (पृष्ठ क्र.२७७)** मध्ये दर्शविलेल्या एकत्रित मालमत्ता कर थकबाकी वसूली एकूण रक्कम रुपये **१७५७३४०/-** थकीत असल्याचे आढळून आले आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे अनुसूचि प्रकरण ८ मधील नियम ४२ अन्वये थकीत रकमा वसूली बाबत कार्यवाही करणे आवश्यक आहे. तथापि त्याप्रमाणे वसुलीची कार्यवाही केली नाही. तरी थकीत रक्कम महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ११ कराधान विभाग नियम १२८ नुसार थकबाकी रक्कम रुपये **१७५७३४०/-** व्याजासहीत वसूल करुन महानगरपालिका निधित जमा करावी. सदर एकत्रित मालमत्ता कर थकबाकीची रक्कम वेळीच वसूल होणे आवश्यक आहे. संबंधितांनी वेळीच एकत्रित मालमत्ता कर थकबाकी वसूली बाबत कार्यवाही का केली नाही ? याचा साधार खुलासा करुन लेखापरिक्षणास अनुपालन दाखवावे.

वसूल पात्र रक्कम रुपये १७५७३४०/-

२४०.**पाणीपट्टी कराच्या थकबाकी रक्कमे बाबत**

वसई विरार शहर महानगरपालिकेच्या वसई विभागीय कार्यालय अंतर्गत येणाऱ्या सांडोर उपविभागीय कार्यालयाचे सन २०१३-१४ या वित्तीय वर्षामधील पाणीपट्टी करविभागाचे लेखापरिक्षण करीत असताना सदर लेखापरिक्षणामध्ये **परिशिष्ट क्र.२२६ (पृष्ठ क्र.२७८)** मध्ये दर्शविलेल्या पाणीपट्टी थकबाकी वसूली एकूण रक्कम रुपये १४९४२१६/- थकीत आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे अनुसूचि प्रकरण ८ मधील नियम ४२ अन्वये थकीत रकमा वसूली बाबत कार्यवाही करणे आवश्यक आहे. तथापी त्याप्रमाणे वसुलीची कार्यवाही केली नाही. तरी थकीत रक्कम रुपये १४९४२१६/- व्याजासहीत वसूल करुन महानगरपालिका निधित जमा करावी. सदर पाणीपट्टी थकबाकीची रक्कम वेळीच वसूल होणे आवश्यक आहे. संबंधितांनी वेळीच पाणीपट्टी थकबाकी वसूली बाबत कार्यवाही का केली नाही याचा खुलासा करावा करीता सदर थकबाकी वसूली बाबत ठोस कार्यवाही करुन लेखापरिक्षणास अनुपालन दाखवावे.

वसूल पात्र रक्कम रुपये १४९४२१६/-

२४१.**नविन कर आकारणी बाबत (अनधिकृत बांधकाम)**

वसई विरार शहर महानगरपालिकेच्या वसई विभागीय कार्यालय अंतर्गत येणाऱ्या सांडोर उपविभागीय कार्यालयाचे सन २०१३-१४ या वित्तीय वर्षातील नवीन कर आकारणी बाबतच्या नस्तीचे लेखा परिक्षण केले असता खालीलप्रमाणे अनियमितता आढळून आली आहे.

उपविभागीय कार्यालय सांडोर हद्दितील **परिशिष्ट क्र.२२७ (पृष्ठ क्र.२७८)** मध्ये दर्शविलेल्या घर क्रमांकानुसार मालमत्ता धारकास नवीन कर आकारणी करतेवेळी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या २६७ (अ) नुसार कार्यवाही केल्याचे लेखापरिक्षणास आढळून आले आहे. करिता संबंधीत नवीन कर आकारणीच्या नस्तीमध्ये कर आकारणी करताना लिपीक /निरिक्षक यांनी प्रत्यक्ष जागेवर जाऊन भेट देऊन मोजमापे घेऊन कर आकारणी करणे आवश्यक असताना तसा अहवाल न घेतल्याचे तसेच अनधिकृत बांधकाम असल्याबाबत संबंधित मालमत्ता धारकाकडून प्रतिज्ञापत्रही न घेतल्याचे व संबधिताने नविन कर आकारणी करताना केलेल्या अर्जाची आवक बारनिशी नोंद न केल्याचे लेखापरिक्षणास आढळून आले आहे. ही बाब प्रशासकीय दृष्टीने गंभीर स्वरुपाची आहे. वरील बाबतील झालेल्या अनियमिततेबाबत साधार खुलासा करुन लेखापरिक्षणास अनुपालन दाखवावे.

२४२.**मालमत्तेची वाढ व घट करते वेळी झालेल्या अनियमिततेबाबत**

वसई विरार शहर महानगरपालिकेच्या वसई विभागीय कार्यालयांतर्गत येणाऱ्या सांडोर उपविभागीय कार्यालयाचे सन २०१३-१४ या वित्तीय वर्षातील मालमत्ता कर विभागातील मालमत्तेची वाढ व घट ची प्रकरणे तपासली असता **परिशिष्ट क्र.२२८ (पृष्ठ क्र.२७८ ते २७९)** मध्ये दर्शविल्यानुसार खालीलप्रमाणे त्रुटी आढळून आल्या आहेत.

महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता १९७१ चे नियम ७५(७) नुसार मालमत्तेची वाढ-घट नोंदवही नमुना नं.४६ मध्ये ठेवणे आवश्यक असताना उपविभागाने तशी वाढ-घट नोंदवही ठेवलेली नाही. परिशिष्टमध्ये दर्शविलेल्या मालमत्ताधारकाच्या अर्जावर आवक बारनिशी मध्ये नोंद नसल्याचे, प्रत्यक्ष पाहणी अहवालावर तसेच अर्जदार व पंचांच्या स्वाक्षरी नसल्याचे लेखापरिक्षणास आढळून आले आहे. प्रत्यक्षामध्ये लेखासहिंता तरतूदीनुसार मागणी मध्ये झालेल्या प्रत्येक बदलाबाबत वाढ व घट नोंदवही मध्ये नोंद झाली पाहीजे व त्यानंतर दुरुस्ती करावयाच्या प्रस्तावावर प्राधिकृत मुल्य निर्धारण अधिकाऱ्याने स्विकृत केल्यावर योग्य साक्षांकन करुन निर्धारण सुचीचा अपिलाचा परिणाम तदनुषंगीक फेरफार करणे आवश्यक आहे परंतु अश्या प्रकारची कार्यवाही न झाल्याचे लेखापरिक्षणास आढळून आलेले आहे. उपरोक्त झालेल्या अनियमिततेबाबत संबंधिताने साधार खुलासा करुन लेखापरिक्षणास अनुपालन दाखवावे.

२४३.**एकत्रित मालमत्ता कराच्या थकबाक्या पुढील वर्षाच्या मागणी नोंदवहीत न ओढल्याबाबत.**

वसई विरार शहर महानगरपालिकेच्या वसई विभागीय कार्यालय अंतर्गत येणाऱ्या सांडोर उपविभागीय कार्यालयाचे सन २०१३-१४ या वित्तीय वर्षामधील मालमत्ता कर विभागाच्या मागणी नोंदवहीचे लेख्यांची तपासणी केली असता महाराष्ट्र नगरपरिषद लेखासहिंता १९७१ मधील नियम ७६ (२) मध्ये नमुद केल्यानुसार सन २०१२-१३ अखेरच्या थकबाक्या सन २०१३-१४ च्या मागणी नोंदवहीत कमी/जास्त ओढल्याचे लेखापरिक्षणात आढळून आले आहे. सोबत **परिशिष्ट क्र.२२९ (पृष्ठ क्र.२७९ ते २८१)** जोडले आहे. कमी ओढलेली रक्कम रु. १०८९७२/- इतकी असून जादा ओढलेली रक्कम रु.१२२३५९/- इतकी आहे. सन २०१२-१३ अखेरची थकबाकीची रक्कम रु.१०८९७२/- कमी ओढल्याने ती कायम स्वरुपी लेख्यातून बाहेर जाण्याची शक्यता आहे. तेव्हा सदर सन २०१२-१३ अखेरच्या थकबाकीच्या रक्कमा मागणी नोंद वहीत न ओढल्याबाबत खुलासा करुन त्या रकमा खातेदाराच्या मागणी नोंदवहीत नोंदी घेऊन त्यांच्याकडून वसूलीची कार्यवाही करावी. तसेच सदरची मागणी रक्कम कमी/जादा का आली याबाबत खुलासा करावा. उपरोक्त अनियमीतता उदाहरणे दाखल देण्यात आले असून त्याचा तपशिल सोबत जोडलेल्या विवरणपत्रकात देण्यात आलेला आहे. उर्वरीत मागणी नोंदवहीतील थकबाकी धारकाच्या थकबाक्या पुढील वर्षात

ओढल्या वा कसे याबाबतची खात्री करुन मेळ घेण्यात यावा. तसेच या वर्षाची व मागील वर्षाची मागणी नोंदवही यातून मागणी विषयक नोंदी अचूकपणे पुढे ओढण्यात आल्या आहेत का? याबाबत खात्रीकरुन तत्कालीन सक्षम प्राधिकृत अधिकाऱ्याने तसे प्रमाणित करणे आवश्यक असताना मागणी नोंदवही प्रमाणित केली नसल्याचे आढळून आले आहे. तरी या बाबत खुलासा करुन लेखापरिक्षणास अनुपालन दाखवावे.

वसुलपात्र रक्कम रु. १०८९७२/-

२४४.**मालमत्ता कराची मागणी व कर निर्धारण सुचीच्या मागणीमध्ये असलेल्या तफावती बाबत : -**

वसई विरार शहर महानगरपालिकेच्या वसई विभागीय कार्यालयांतर्गत सांडोर उपविभागीय कार्यालयाचे सन २०१३-१४ या वित्तीय वर्षातील मालमत्ता कर विभागातील कर निर्धारण सुची व मागणी नोंदवहीची पडताळणी करीत असता महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता १९७१ च्या नियम क्र ७५ नुसार व नियम क्र. ७६ च्या १ व ४ अन्वये कर निर्धारण सुचीमध्ये दर्शवलेली मागणी व मागणी नोंदवही नमुना नं.४७ मध्ये दर्शविलेली मागणी हयामध्ये कमी/जास्त रक्कम ओढल्याचे लेखा परिक्षणात आढळून आले आहे. सोबत **परिशिष्ट क्र.२३० (पृष्ठ क्र.२८१ ते २८५)** जोडले आहे. ह्या बाबत झालेल्या अनियमीततेबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यांत येत आहे.

कर निर्धारण सुची नोंदवही नमुना नं.४३ मध्ये नोंद केलेली दिसून येत आहे. पंरतु प्रत्यक्षात सदरच्या मागणीची नोंद नमुना नं.४७ मध्ये कमी/जास्त घेतल्याचे दिसून येत आहे. प्रत्यक्षात निर्धारण सुची पूर्ण आणि अधिप्रमाणित झाल्यावर लगेच त्या वर्षामध्ये मागणी पुस्तक उघडण्यात आले पाहिजे व तश्या नोंदी मागणी नोंदवहीत घेतल्या पाहिजेत. वित्तीय वर्षाअखेर मागणी पुस्तकांच्या सर्व नोंदी पूर्ण झाल्यावर त्याच्या प्रत्येक पानांवरील रक्कमेच्या बेरजा करुन शेवटच्या पानांवर अग्रेषीत कराव्यात व त्या मागणी पुस्तकांवर संबंधित प्राधिकृत अधिकाऱ्याने साक्षांकित केले पाहिजे. परंतु सदरच्या नोंदी साक्षांकीत प्राधिकृत अधिकाऱ्यांने न केल्याचे लेखापरिक्षणात आढळून आले आहे. तरी याबाबत खुलासा करुन लेखापरिक्षणास अनुपालन दाखवावे.

२४५. **तलाव लिलाव निविदा नस्तीमधील अनियमिततेबाबत :-**

वसई विरार शहर महानगरपालिकेच्या वसई विभागीय कार्यालयांतर्गत सांडोर उपविभागीय कार्यालयातील सन २०१३-१४ या वित्तीय वर्षामधील तलाव लिलाव नस्तींचे लेखापरीक्षण केले असता **परिशिष्ट क्र.२३१ (पृष्ठ क्र.२८६)** मध्ये दर्शविल्याप्रमाणे तलाव लिलावकामी निविदा मागविण्यात आल्याचे दिसून येते. सदर निविदा मागविल्या नंतर निविदाच्या तुलनांत्मक तक्तावर प्राधिकृत अधिकाऱ्यांच्या स्वाक्षरी तसेच करारनामावर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसूची ड प्रकरण ५ मधील अनुक्रमांक २ नुसार महानगरपालिकेच्या सचिवाच्या अभिरक्षेत असलेली सामान्य मुद्रा प्रत्येक संविदेवर लावणे, स्थायी समितीचे दोन सदस्य व उपायुक्त दर्जापेक्षा कमी नसलेला कोणताही अधिकारी यांचे उपस्थितीत करारपत्र करण्यात आले पाहिजे. प्रस्तुत प्रकरणी या प्रकारची कोणतीही बाब लेंखापरिक्षणास आढळून आली नाही. सांडोर विभागातील रेलबाव तलाव लिलावाच्या ठेकेदार श्री. ओमकार च. मराठे यांनी रक्कम रु.५५००/- दि.०१/१०/२०१३ ते ३१/१२/२०१३ कालावधीमध्ये तलावाच्या हप्ता विहीत कालावधी मध्ये भरणा न केल्यामुळे करारनामाच्या अटी शर्ती नुसार संबंधितांकडून हप्ता रु. ५५००/- व त्यावरील व्याज/दंडाची रक्कम वसुल करुन महानगरपालिका निधीमध्ये जमा केल्याचे लेखापरिक्षास अनुपालन दाखवावे.

२४६.**मंजूर नस्तीप्रमाणे नविन कर आकारणी न केल्याबाबत :-**

वसई विरार शहर महानगरपालिकेच्या वसई विभागीय कार्यालय अंतर्गत येणाऱ्या सांडोर उपविभागीय कार्यालयाचे सन २०१३-१४ या वित्तीय वर्षातील मालमत्ता कर विभागातील नविन कर आकारणी नस्तीचे लेखा परिक्षण केले असता खालीलप्रमाणे अनियमीतता झाल्याचे लेखापरिक्षणास आढळून आले आहे.

विकासक मे. महावीर इंटरप्रायजेस तर्फे राकेश ए. शहा यांची महावीर प्लाझा (इमारत क्र.१) ही इमारत तळमजला अधिक चार मजली सर्व्हे नं. २०८ अ सांडोर विभागामध्ये बांधण्यात आलेली असून त्याचा मालमत्ता क्र.२३४६ असा आहे. सदर इमारतीस मंजूर नस्तीनुसार भोगवटा प्रमाणपत्र क्र. सिडको/व्हीव्हीएसआर/पीओसी/बीपी-३८७८ डब्ल्यु/३३३ दि.२०/०५/२०१० असा आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १२८ व कलम १५० नुसार कर आकारणी करताना ज्या आर्थीक वर्षापासून भोगवाटा प्रमाणपत्र देण्यात आले आहे किंवा इमारतीमध्ये रहिवाशीसाठी जागा उपलब्ध झाली आहे त्यानुसार मालमत्तेची कर आकारणी होणे आवश्यक आहे. प्रस्तुत प्रकरणी संबंधित विकासकाने नस्ती सोबत जोडलेल्या भोगवटा प्रमाणत्रानुसार सदरचे भोगवटा प्रमाणपत्र सन २०१०-११ या वित्तीय वर्षामध्ये घेतल्याचे दिसून येते. त्यामुळे सदर मालमत्तेवर सन २०१०-११ या वित्तीय वर्षापासून कर आकारणी होणे आवश्यक होते. परंतु सदर प्रकरणी मालमत्ताधारकांची नविन कर आकारणी संबंधित विभाग प्रमुखाने सन २०१३-१४ या वित्तीय वर्षापासून केली आहे. त्यामुळे **परिशिष्ट क्र.२३२ (पृष्ठ क्र.२८६)** दर्शविल्यानुसार महानगरपालिकेचे आर्थिक उत्पन्न रक्कम रु.९१३८०/- नुकसान झाल्याचे लेखापरिक्षणास आढळून आले आहे. करिता संबंधित मालमत्ताधारकाकडून सदरची तफावत रक्कम रु. ९१३८०/- वसुल करुन महानगरपलिका फंडात जमा करुन व या झालेल्या अनियमिततेबाबत साधार खुलासा करुन लेखापरिक्षणास अनुपालन दाखवावे.

वसूलपात्र रक्कम रु. ९१३८०/-

वसई-विरार शहर महानगरपालिका
वसई विभागीय कार्यालय अंतर्गत कराडी उपविभागीय कार्यालयाचा
दि. ०१ एप्रिल २०१३ ते दि. ३१ मार्च २०१४ पर्यंतचा लेखा परिक्षण अहवाल

२४७. **एकत्रित मालमत्ता कराच्या थकबाकी रक्कमे बाबत**

वसई विरार शहर महानगरपालिकेच्या वसई विभागीय कार्यालय अंतर्गत येणाऱ्या कराडी उपविभागीय कार्यालयाचे सन २०१३-१४ या वित्तीय वर्षामधील मालमत्ता कर विभागाचे लेखापरिक्षण करीत असताना सदर लेखापरिक्षणामध्ये **परिशिष्ट क्र.२३३ (पृष्ठ क्र.२८६)** मध्ये दर्शविलेल्या एकत्रित मालमत्ता कर थकबाकी वसूली एकूण रक्कम रुपये ६९१२३/- थकीत असल्याचे आढळून आले आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे अनुसूचि प्रकरण ८ मधील नियम ४२ अन्वये थकीत रकमा वसूली बाबत कार्यवाही करणे आवश्यक आहे. तथापि त्याप्रमाणे वसुलीची कार्यवाही केली नाही. तरी थकीत रक्कम महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ११ कराधान विभाग नियम १२८ नुसार थकबाकी रक्कम रुपये **६९१२३/-** व्याजासहीत वसूल करुन महानगरपालिका निधित जमा करावी. सदर एकत्रित मालमत्ता कर थकबाकीची रक्कम वेळीच वसूल होणे आवश्यक आहे. संबंधितांनी वेळीच एकत्रित मालमत्ता कर थकबाकी वसूली बाबत कार्यवाही का केली नाही ? याचा साधार खुलासा करुन लेखापरिक्षणास अनुपालन दाखवावे.

वसूल पात्र रक्कम रुपये ६९१२३/-

वसई-विरार शहर महानगरपालिका
वसई विभागीय कार्यालय अंतर्गत कौलार खुर्द उपविभागीय कार्यालयाचा
दि. ०१ एप्रिल २०१३ ते दि. ३१ मार्च २०१४ पर्यंतचा लेखा परिक्षण अहवाल

२४८. **एकत्रित मालमत्ता कराच्या थकबाकी रक्कमे बाबत**

वसई विरार शहर महानगरपालिकेच्या वसई विभागीय कार्यालय अंतर्गत येणाऱ्या कौलार खुर्द उपविभागीय कार्यालयाचे सन २०१३-१४ या वित्तीय वर्षामधील मालमत्ता कर विभागाचे लेखापरिक्षण करीत असताना सदर लेखापरिक्षणामध्ये **परिशिष्ट क्र.२३४ (पृष्ठ क्र.२८७)** मध्ये दर्शविलेल्या एकत्रित मालमत्ता कर थकबाकी वसूली एकूण रक्कम रुपये २६२४०/- थकीत असल्याचे आढळून आले आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे अनुसूचि प्रकरण ८ मधील नियम ४२ अन्वये थकीत रकमा वसूली बाबत कार्यवाही करणे आवश्यक आहे. तथापि त्याप्रमाणे वसुलीची कार्यवाही केली नाही. तरी थकीत रक्कम महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ११ कराधान विभाग नियम १२८ नुसार थकबाकी रक्कम रुपये २६२४०/- व्याजासहीत वसूल करुन महानगरपालिका निधित जमा करावी. सदर एकत्रित मालमत्ता कर थकबाकीची रक्कम वेळीच वसूल होणे आवश्यक आहे. संबंधितांनी वेळीच एकत्रित मालमत्ता कर थकबाकी वसूली बाबत कार्यवाही का केली नाही ? याचा साधार खुलासा करुन लेखापरिक्षणास अनुपालन दाखवावे.

वसूल पात्र रक्कम रुपये २६२४०/-

वसई-विरार शहर महानगरपालिका
वसई विभागीय कार्यालय अंतर्गत कौलार बुद्रुक उपविभागीय कार्यालयाचा
दि. ०१ एप्रिल २०१३ ते दि. ३१ मार्च २०१४ पर्यंतचा लेखा परिक्षण अहवाल

२४९. **एकत्रित मालमत्ता कराच्या थकबाकी रक्कमे बाबत**

वसई विरार शहर महानगरपालिकेच्या वसई विभागीय कार्यालय अंतर्गत येणाऱ्या कौलार बुद्रूक उपविभागीय कार्यालयाचे सन २०१३-१४ या वित्तीय वर्षामधील मालमत्ता कर विभागाचे लेखापरिक्षण करीत असताना सदर लेखापरिक्षणामध्ये **परिशिष्ट क्र.२३५ (पृष्ठ क्र.२८७)** मध्ये दर्शविलेल्या एकत्रित मालमत्ता कर थकबाकी वसूली एकूण रक्कम रुपये १०८३३६/- थकीत असल्याचे आढळून आले आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे अनुसूचि प्रकरण ८ मधील नियम ४२ अन्वये थकीत रकमा वसूली बाबत कार्यवाही करणे आवश्यक आहे. तथापि त्याप्रमाणे वसुलीची कार्यवाही केली नाही. तरी थकीत रक्कम महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ११ कराधान विभाग नियम १२८ नुसार थकबाकी रक्कम रुपये १०८३३६/- व्याजासहीत वसूल करुन महानगरपालिका निधित जमा करावी. सदर एकत्रित मालमत्ता कर थकबाकीची रक्कम वेळीच वसूल होणे आवश्यक आहे. संबंधितांनी वेळीच एकत्रित मालमत्ता कर थकबाकी वसूली बाबत कार्यवाही का केली नाही ? याचा साधार खुलासा करुन लेखापरिक्षणास अनुपालन दाखवावे.

वसूल पात्र रक्कम रुपये १०८३३६/-

२५०. **तलाव लिलाव निविदा नस्तीमधील अनियमिततेबाबत :-**

वसई विरार शहर महानगरपालिकेच्या वसई विभागीय कार्यालय अंतर्गत येणाऱ्या कौलार बुद्रुक उपविभागीय कार्यालयातील सन २०१३-१४ या वित्तीय वर्षामधील देवाळी तलाव लिलाव नस्तींचे लेखापरीक्षण केले असता **परिशिष्ट क्र.२३६ (पृष्ठ क्र.२८७)** मध्ये दर्शविल्याप्रमाणे तलाव लिलावकामी निविदा मागविण्यात आल्याचे दिसून येते. सदर निविदा मागविल्या नंतर निविदाच्या तुलनांत्मक तक्तावर प्राधिकृत अधिकाऱ्यांच्या स्वाक्षरी तसेच करारनामावर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसूची ड प्रकरण ५ मधील अनुक्रमांक २ नुसार महानगरपालिकेच्या सचिवाच्या अभिरक्षेत असलेली सामान्य मुद्रा प्रत्येक संविदेवर लावणे, स्थायी समितीचे दोन सदस्य व उपायुक्त दर्जापेक्षा कमी नसलेला कोणताही अधिकारी यांचे उपस्थितीत करारपत्र करण्यात आले पाहिजेत. प्रस्तुत प्रकरणी या प्रकारची कोणतीही बाब लेंखापरिक्षणास आढळून आली नाही. सदर झालेल्या अनियमिततेबाबत साधार खुलासा करुन लेखापरिक्षणास अनुपालन दाखवावे.

वसई-विरार शहर महानगरपालिका
वसई विभागीय कार्यालय अंतर्गत येणाऱ्या गिरीज उपविभागीय कार्यालयाचा
दि. ०१ एप्रिल २०१३ ते दि. ३१ मार्च २०१४ पर्यंतचा लेखा परिक्षण अहवाल

२५१. **एकत्रित मालमत्ता कराच्या थकबाकी रक्कमे बाबत**

वसई विरार शहर महानगरपालिकेच्या वसई विभागीय कार्यालय अंतर्गत येणाऱ्या गिरीज उपविभागीय कार्यालयाचे सन २०१३-१४ या वित्तीय वर्षामधील मालमत्ता कर विभागाचे लेखापरिक्षण करीत असताना सदर लेखापरिक्षणामध्ये **परिशिष्ट क्र.२३७ (पृष्ठ क्र.२८८)** मध्ये दर्शविलेल्या एकत्रित मालमत्ता कर थकबाकी वसूली एकूण रक्कम रुपये ८७७५३७/- थकीत असल्याचे आढळून आले आहे.

